INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261

ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

March-2019 Special Issue – 164

## Mahatma Gandhi's Thoughts & Its Present Relevance

**Guest Editor:**
Dr. C. J. Khillare
Principal
Rayat Shikshan Sanstha's
Rajarshi Chhatrapati Shahu College,
Kolhapur, Dist. Kolhapur.

**Executive Editor of the issue:**
Mr. S. M. Mahajan
Dr. Mrs. M. B. Desai
Mrs. M. K. Kannade
Dr. Mrs. B. S. Puntambekar
Dr. M.M. Bandhare
Mr. S.A. Jadhav
Mr. V.K. Akhade
Miss. Dr. S. R. Kulkarni
Miss. A. V. Jadhav
Mr. B. B. Ghurke

**Chief Editor:**
Dr. Dhanraj Dhangar (Yeola)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

SWATIDHAN PUBLICATIONS

For Details Visit To : www.researchjourney.net

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 164 - Mahatma Gandhi's Thoughts & Its Present Relevance
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
March-2019

# महात्मा गांधीचे आर्थिक विचार व समकालीन उपयुक्तता

प्रा. मधुरा बाबासाहेब देसाई
सहयोगी प्राध्यापिका,
अर्थशास्त्र विभाग,
राजर्षी छ. शाहू कॉलेज, कोल्हापूर.

गोषवारा

म. गांधीजींचे आर्थिक विचार श्रेष्ठ असूनही त्यांचा मोठा प्रमाणावर स्वीकार झाला नाही. विश्वस्ताची संकल्पना मात्र अर्थशास्त्रविषयक विचाारात कार्याचा विचार करण्याची व अंमलबजावणी करण्याच्या योग्यतेची आहे. विकेंद्रीकरणात्मक अर्थव्यवस्था, स्वदेशी चळवळ बेकारी निवारण यासंदर्भात म. गांधींचे विचार आजही उपयुक्त आहेत. ग्रामविकास, आर्थिक सत्तेची विकेंद्रीकरण, भांडवलदशाची विश्वस्ताची भूमिका, पर्यावरण संरक्षण, समानता इ. या दृष्टीकोनातून म. गांधीचे आर्थिक विचार आजही उपयुक्त आहेत. आर्थिक विषमता कमी करण्यासाठी, ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी, स्वदेशी उद्योगांना संरक्षण मिळण्यासाठी, स्वदेशी वस्तुंची स्पर्धाशक्ती वाढणेसाठी म. गांधीचे आर्थिक विचार सदयस्थितीत उपयुक्त आहेत.

## प्रस्तावना

आज जगभरात आर्थिक विषमता वेगाने वाढत आहे. जगभरात ही विषमता दूर करण्यासाठी अनेक विचारप्रवाह पुढे येत आहेत. महात्मा गांधीची जीवनविषयक, समाजविषयक दृष्टीकोन हे सर्व आयामांना कवेत घेणारे होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळीत स्वातंत्र्य लढयाबरोबर त्यांनी अनेक विषयात मुलभूत तत्वज्ञान दिले. या मुलभूत विषयात त्याचे अर्थविषयक विचार आजही चिंतनीय आहेत. गांधीजींच्या आर्थिक विचारांवर जेवढे लिखाण झाले, तेवढे मंथन झाले. तेवढे आधुनिक काळातील कोणत्याही भारतीय तज्ज्ञांच्या बाबतीत झालेले नाही. यावरुन म. गांधीच्या आर्थिक विचारांचे महत्त्व स्पष्ट होते. गांधीजी अर्थशास्त्रज्ञ नव्हते, जे आर्थिक विचार मांडले ते मान्यही होते. आर्थिक समता, वारसा हक्क, शारीरिक श्रम, ग्रामोद्योग, विश्वस्तपणाचे तत्त्व, उद्योगधंदे, स्वदेशी चळवळ, आदर्श खेडयांची संकल्पना, कामगार चळवळ या आर्थिक बाबीशी निगडीत असणाऱ्या या संकल्पनांशी निगडीत समर्पक असे आर्थिक विचार मांडले आहेत. भारताच्या स्वातंत्र्य लढयात त्यांचे विचार प्रेरणादायी होतेच त्याशिवाय आर्थिक विचारही आर्थिक विषमता दूर करण्यासाठी ही उपक्रम होते. दारिद्रय ग्रामीण शिक्षणाबाबत विचार, रामराज्याची संकल्पना, दारुबंदी या विचाराबरोबरच आर्थिक विचार ही महत्वाचे आहेत. महात्मा गांधीजींचे विचार भारतासाठीच नव्हे जगाच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रेरक आहेत. महात्मा गांधी यांनी पैसा आणि भौतिक संपत्तीपेक्षा मानवी श्रम, नैतिकता, मानवी मूल्यांना अधिक महत्वाचे स्थान दिले. म्हणून म. गांधीचे आर्थिक विचार लोककल्याणकारी अर्थशास्त्राचा भाग आहेत.

महात्मा गांधींना आर्थिक विचारात अपेक्षित बदल ग्रामविकास, ग्रामीण, स्वराज्य, स्वदेशी, यांत्रिकीकरण, कुटीरोद्योगांबाबत सर्वोदय अराज्यवाद या सर्व संकल्पनात अर्थशास्त्रामधील मुलभूत बदल अपेक्षित होते. गांधीजींनी स्वराज्याला मिळवण्यासाठी दिलेले नितीशास्त्र व अर्थशास्त्र यात समांतर फरक आहे. संपूर्ण जगाची अर्थव्यवस्था कशी असावी ज्यात किमान गरजा पूर्ण करण्याइतके उत्पन्न मिळावे. समाजातील श्रीमंत लोकांनी आपल्या संपत्तीचा उपयोग गरीब लोकांच्या कल्याणांकरीता व संपूर्ण समाजाचे विश्वस्त म्हणून कार्य करावे. हा विश्वस्त संकल्पनेचा मार्ग आर्थिक क्रांतीला दिशा देणारा आणि आर्थिक विकासासाठी पोषक ठरणारा आहे. व भांडवलदारांना नाहीसा करणारा आहे असे मत विश्वस्त या संकल्पनेत गांधींचे आर्थिक विचार होते. प्रत्येक

क्षेत्रातील त्यांच्या कुवतीनुसार उत्पन्नाच्या प्रमाणात सर्वांना आर्थिक समानता मिळवणे काळाची गरज आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. खेडी स्वयंपूर्ण आर्थिकदृष्ट्या होण्यासाठी त्यांनी 'खेड्याकडे चला' असा संदेश दिला होता. सद्य परिस्थितीचा विचार करता 'ग्रामीण स्वराज्य' संकल्पनेविषयी आर्थिक विचारसरणी व आजच्या ग्रामीण भागाचा विकास या संदर्भात म. गांधींचे आर्थिक विचार व या विचारांची समकालीन उपयुक्तता या अनुषंगाने प्रस्तुत शोधनिबंधात विचार मांडण्यात आले आहेत.

गांधी तत्त्वज्ञान, आर्थिक विश्लेषण समकालीन उपयुक्तता

**उद्दिष्ट्ये**

१. गांधींच्या आर्थिक विचारांचे विश्लेषण करणे.

२. म. गांधीजींचे आर्थिक विचार व आजच्या परिस्थितीतील उपयुक्तता यांचा शोध घेणे.

**महात्मा गांधींचे आर्थिकविषयक विचार**

गांधीजींचे अर्थशास्त्र तीन अवस्थांमध्ये विकसित होत गेले.

**नकारात्मक भूमिकेची अवस्था**

१९१९ पर्यंत ही अवस्था असल्याचे दिसून येते. हिंद स्वराज्यामध्ये त्यांची भूमिका पाश्चिमात्य संस्कृतीविरोधी असल्याचे दिसून येते. या भांडवलशाही संस्कृतीशी संबंधित विकास, तांत्रिक प्रगती, यांत्रिकीकरण त्यांनी नाकारले.

**सकारात्मक भूमिकेची अवस्था**

पाश्चात्य संस्कृती भांडवलशाहीला विरोध दर्शवीत १९१९–१९३४ या काळात स्वदेशी चळवळ सुरू करून पाश्चात्य भांडवलशाहीला त्यांनी त्यांची नकार या माध्यमाने उचललेले दिसते.

**व्यावहारिक दृष्टिकोन**

१९३४ नंतर भारतीय मूल्यांमध्ये आधारलेली अर्थव्यवस्था असावी. या दृष्टीने त्यांनी सर्वोदय, ग्रामोद्योग, श्रमनिष्ठा, स्वदेशी, स्वावलंबन, विश्वस्त असे अनेक संकल्पना मांडल्या.

गांधीजींचे अर्थकारण आणि राजकारण हे त्यांच्या जीवनाची साधनेची अंगे होती.

**ग्रामस्वराज्य**

आजही भारतातील बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात राहते. म. गांधींना खेड्यात आर्थिक विकास हवा होता. खेड्याकडे चला हा संदेश म्हणून त्यांनी दिलेला होता. भारतातील प्रत्येक खेडेगाव छोटे प्रजासत्ताक व आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाले पाहिजे यासाठी त्यांनी ग्रामस्वराज्याची आदर्श संकल्पना मांडली. ग्रामस्वराज्यात गांधींना खेड्याची रचना नेटनेटकी, धर्मशाळा, दवाखाना, शाळा, सार्वजनिक हॉल, खेळाचे मैदान व जनावरांसाठी राखीव जागा असावी, खेड्यातील रस्ते व गल्ल्या स्वच्छ असाव्यात असे मानसिकदृष्ट्या अपेक्षित होते. ग्रामीण भागाच्या विकासासाठी स्थापन केलेले साखर कारखाने, सूतगिरण्या, खरेदी–विक्री संघ इत्यादी जनतेच्या सेवेसाठी न राहता भ्रष्टाचार व राजकारणाचे अड्डे बनले आहेत. खेड्यातील एकता संपुष्टात येऊन राजकीय संघर्ष वाढीस लागले आहेत. या पार्श्वभूमीवर म. गांधींनी सांगितलेले आर्थिक विचार खेड्यातील विषमता दूर करण्यासाठी उपयुक्त आहेत.

**खादी व ग्रामोद्योग**

गांधीजी असे म्हणत भारत खेड्यात राहतो. ग्रामीण भागाचा विकास व उद्योगांच्या विकासासाठी लक्ष दिले पाहिजे यासाठी त्यांनी ग्राम स्वराज्याची कल्पना मांडली. खेड्यातील आरोग्य, बेकारी, दारिद्र्य हे प्रश्न

सोडविण्यासाठी खेडयात खादी उद्योग व अन्य ग्रामोद्योग सुरु केले पाहिजेत असे प्रतिपादन केले होते. गूळ तयार करणे, टोपल्या तयार करणे, दोरखंड, केरसुण्या, तेल काढणे, साबण तयार करणे, मध जमा करणे इ. ग्रामोद्याग खेडयात सुरु करावेत असे ते म्हणत.

## विश्वस्तपणाचे तत्व

विश्वस्त संकल्पनेत म. गांधीना संपत्ती ही कुणाच्या वैयक्तिक मालकीची नको होती. न्याय गरजा भागविण्यासाठी संपत्तीतून आवश्यक तेवढेच घ्या. बाकी राहिलेली संपत्ती तुमची नाही. समाजासाठी वापरा. प्रत्येक श्रीमंताने अशी विश्वस्त वृत्ती धोरण स्विकारले तर अहिंसक मार्गाने समाजातील आर्थिक विषमता दूर होईल.

## सर्वोदय

मं. गांधींनी मांडलेली सर्वोदयाची कल्पना तर आर्थिकदृष्टया सर्वात महत्वाचा आहे. सर्वसमावेशक शाश्वत विकासासाठी सर्वोदयाची कल्पना हा विचार महत्वपूर्ण ठरतो. सर्वोदय म्हणजे समाजातील सर्वांचे हित सर्वांचे कल्याण होय. इतकेच नव्हे तर एकमेकांशी न्यायाने वागावे मिळून मिसळून रहावे म्हणजे सर्वोदय होय.

## स्वदेशी

स्वदेशी संकल्पनेत स्वदेशी म्हणजे 'जो धंदा भारतीय जनतेच्या हिताचा असेल, ज्यामध्ये भारतीय कामगार काम करीत असतील, व्यवसायातील भांडवल व यंत्रसामग्री भारतीयांची असेल व अशा धंदयातील भारतीय कामगारांना निर्वाह इतके वेतन, राहण्यास घर व त्यांच्या मुलींच्या कल्याणासाठी मालकीची हमी मिळेल असा कोणताही उद्योग व त्यात तयार होणारा स्वदेशी माल अशी स्वदेशीची व्याख्या होती.

औद्योगिक क्षेत्रातील भरभराट ब्रिटिश आगमन होईपर्यंत टिकून होती. ब्रिटिशांची राजवट प्रस्थापित झाल्यानंतर हे सर्व चित्र बदलले. लघु व कुटीर उद्योग बंद पडले. यातून बेकारी व दारिद्रय वाढले. ग्रामीण व्यवस्था उद्ध्वस्त झाली. त्यामुळे गांधीजींनी स्वदेशीचा नारा दिला.

## विकेंद्रित विकास अर्थात सर्वसमावेशक विकास

विकास योजनांची आखणी चढत्या क्रमाने व्हायला हवी स्थानिक विकासाकडून राष्ट्रीय विकासाकडे वाटचाल झाली पाहिजे. आजही ती आवश्यक असल्याचे अनेक सामाजिक व स्वयंसेवी संस्था आग्रहाने सांगतात. स्वातंत्र्योत्तर काळात नियोजनाचा उतरत्या क्रमाचा झिरपण्याचा सिंध्दांत कुचकामी ठरला. विकास शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला नाही. सर्वसमावेशक व शाश्वत विकासासाठी गांधीजींची रचना गरजेची वाटते.

## मं/ गांधजींच्या आर्थिक विचारांची सदय:स्थितीत उपयुक्तता

ऑक्सफॉमचा जागतिक अहवाल सांगतो की जगभरातील ८० टक्के संपत्ती २० टक्के उद्योजकांकडे व २० टक्के संपत्तीत संपूर्ण जग चालले आहे. या निष्कर्षाचा विचार अधिक साकल्याने करता म. गांधींच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता लक्षात येते.

सर्वसामान्य नेते, लोक व कार्यकर्ते यांना आर्थिक शिस्तीची गरज भारतात निर्माण झाली आहे. आजच्या घडीला भारतात खादी व अन्य उद्योग खेडयात विकसित होण्याऐवजी शहरी भागात केंद्रीकरण झाल्यामुळे ग्रामीण लोकांचा कल शहराकडे वाढला आहे. शहरात शहरीकरणाचे अनेक तोटे झाले आहेत. ग्रामीण भागातील उत्पन्नाचे साधन नाहीसे झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढले आहे. खेडयातील ग्रामोद्योग संपुष्टात येऊन खेडी वकाल बनली. या पार्श्वभूमीवर खेडयाकडे चला ही संकल्पना महत्वाची आहे.

आज आर्थिक विषमता जगभरात वाढत आहे. समाजात ही श्रीमंतीचा हव्यास वाढला आहे. समाजात गरीब व श्रीमंत यांच्यातील दरी वाढली. विषमतेच्या निर्वानासाठी सदय:स्थितीत म. गांधीजीं विश्वस्तपणाची संकल्पना आर्थिक विकेंद्रीकरणासाठी महत्वपूर्ण आहे.

सर्वोदय ही कल्पना आजच्या जगात खूप महत्वाची आहे. सर्वोदय म्हणजे समाजातील सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण होय. श्रीमंत, गरीब, मालक, मजूर, उद्योगपती–कामगार या वर्गामध्ये संघर्ष दिसत आहे. सर्वांचे हित, सर्वांचे कल्याण यापेक्षा व्यक्तिगत हिताला महत्व आले आहे. या परिस्थितीत सर्वोदयाची संकल्पना सर्वाधिक आर्थिक समानतेसाठी उपयुक्त आहे.

आजच्या भारतीय अर्थव्यवस्थेचा विचार केला तर निर्यातीपेक्षा आयात वाढली आहे. त्यामुळे रुपयाचे अवमूल्यन झाले आहे. दिवसेंदिवस कर्जाचा बोजा वाढत आहे. यावर मात करण्यासाठी गांधीजींनी दिलेल्या स्वदेशी आर्थिक धोरणाची आठवण येते.

महात्मा गांधीजींची विश्वस्त या संकल्पनेवर एवढा विश्वास होता की, हदयपरिवर्तन होऊन श्रीमंत आपल्या संपत्तीचा मोठा हिस्सा खुशीने समाजाला देतील, अर्थव्यवस्था भांडवलशाहीतून समाजवादाकडे वाटचाल करेल. असे गांधींना वाटत असे. मात्र सद्य:स्थितीत कधीही शक्य होईल असे वाटत नाही.

## निष्कर्ष

१. म. गांधींचे अर्थविषयक विचार व्यावहारिक पातळीवर न येता आदर्शवादाच्या पातळीवर राहिले.
२. गांधीजींचा कुटीर व ग्रामोद्योगावरील भर वर्तमानाशी विसंगत ठरला.
३. श्रमाच्या उत्पादन क्षमतेवर पूर्ण वापर भांडवलनिर्मिती व ग्राहकांचा प्रतिसाद मिळण्याबाबत कुटिरोद्योग व ग्रामोद्योग अपयशी ठरेल.
४. ग्राम ते राष्ट्रीय या पध्दतीचे आर्थिक नियोजन म. गांधींना अपेक्षित होते. सद्य:स्थितीत हा विचार अधिक उपयुक्त वाटतो.
५. भारतात विदेशी गुंतवणूक मोठया प्रमाणात वाढत आहे या पार्श्वभूमीवर जागतिकरणात स्वदेशीचे स्वप्न साकारणे कठीण आहे.
६. मोठया औद्योगिकरणातून सातत्याने बेकारीला सामोरे जावे लागते आहे. हे गांधीजींचे मत आजही मान्य करावे लागेल.

## संदर्भ

१. प्रा. श्री. देसाई स. मु., प्रा. सौ. थोरात निर्मला, भारतीय अर्थव्यवस्था भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, (२००९)
२. जीवन साधना, गांधी विचारदर्शन खंड तिसरा, गांधी वाड:मय प्रकाशन समिती, महाराष्ट्र.
३. पाटील जे. ए., (सं) आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, (२०१३)
४. गांधी मोहनदास करमचंद: सत्याचे प्रयोग (अनु. सीताराम पटवर्धन) नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदनगर, १४, १९६९.
५. Economic Thoughts of M.K. Gandhi & Adam Smith, MMH, Sardana (e. Book)
६. म. गांधींचे आर्थिक विचार व सद्य:स्थिती, (सं) प्रा. डॉ. जे.एस.पाटील, प्रा.डॉ. जे. एफ. पाटील, भारती मुद्रणालय, (२०१५)
७. डॉ. कविमंडन विजय : आर्थिक विचारांचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, २३ नवी रामदास पेठ, नागपूर, १९९०.

## संकेत स्थळे

1. www.academia.edu
2. http://en/wikipedia.org/wiki/Gandhian Economics
3. www.bookgnga.com